लाल मंडी

वि.

पश्चिम बंगाल राज्य शासन

४ एप्रिल, १९९५

मा. न्यायमूर्ती डॉ. ए.एस. आनंद आणि मा. न्यायमूर्ती एम.के. मुखर्जी

भारतीय दंड विधान १९६० कलम ३०२- फौजदारी अपिल - 'ॲपेलेट' न्यायालयाने पुराव्याची छाननी करणे - स्वतंत्र निष्कर्षाला येण्याकरीता 'ॲपेलेट' कोर्टाने पुराव्याची छाननी करणे आवश्यक - तशी छाननी केल्यानंतर, दोन दृष्टीकोन निर्माण झाल्यास, आरोपीस संशयाचा फायदा दयावा.

भारतीय राज्य घटना कलम १३६ - 'ॲपेलेट' न्यायालय सहसा पुराव्याची पुर्न-छाननी करत नाही. तथापि, काही प्रकरणात न्यायालयीन सद्सदविवेकबुध्दीच्या समाधानासाठी पटलावरील पुराव्याचे विश्लेषण करता येईल.

सत्र न्यायालयाने अपिलार्थीला भा.द.वि.कलम ३०७/३४ आणि भा.द.वि. कलम २०१ खाली शिक्षा ठोठावली. उच्च न्यायालयाने पुराव्याचा विचार न करता, अपिल फेटाळताना असे धरले की, सत्र न्यायाधीशांना त्यांच्यासमोर साक्ष देणा-या साक्षीदारांचे हावभाव आणि वर्तणूक न्याहाळण्याची संधी होती. त्यामुळे त्यांनी जे पुराव्याचे मूल्यांकन केले आहे ते जरी पुराव्याची छाननी केल्यानंतर, दोन दृष्टीकोनाची शक्यता निर्माण झाली तरी 'ॲपेलेट' कोर्टास बदलता येणार नाही. म्हणून विशेष अनुमती याचिकेच्या स्वरुपात हे अपिल करण्यात आले आहे. अपिलार्थी याला

भा.द.वि.कलम ३०२/३४ आणि भा.द.वि. कलम २०१ खाली ठोठावण्यात आलेली शिक्षा रद्द करताना या न्यायालयाने असे धरले आहे की,

१ - कनिष्ठ न्यायालय ज्या निष्कर्षाला पोहोचले त्यास योग्य ते वजन देणे 'अपेलेट' न्यायालयाने आवश्यक आहे. पण हे लक्षात ठेवणे गरजेचे आहे की, 'अपेलेट' न्यायालयाचे त्याचप्रमाणे हे ही कर्तव्य आहे की, कनिष्ठ न्यायालयाप्रमाणे पुराव्याची आंतर-बाहय तपासणी करणे आणि पटलावर उपलब्ध असलेल्या सर्व परिस्थीतीचा विचार करुन, स्वतंत्ररित्या निष्कर्षाला येणे. 'अपेलेट' न्यायालय आपल्या आवश्यक कर्तव्यापैकी, 'गुन्हेगार दोषी आहे की, निरागस आहे? या एका कर्तव्यात अपयशी ठरले आहे. पुराव्याची छाननी करण्यास ते कमी पडले आहे आणि त्या छाननीच्या आधारे स्वतंत्ररित्या निष्कर्ष नोंदवण्यात उच्च न्यायालय अपयशी ठरले आहे. त्यामुळे त्यांचा दृष्टीकोन हा स्पष्टपणे त्रुटीपूर्ण झाला आहे.

२ आरोपीला शिक्षा ठोठावल्या विरुध्दचे अपिल आणि त्याला निर्दोष सोडलेल्या निकालावरील अपिल या दोन्हींचे काम करताना, 'अपेलेट' कोर्टाचे अधिकार जरी सारखेच विस्तृत असले तरी, त्या दोन्हीतील पुराव्याचे वजन वेगळे आणि स्वतंत्र आहे. निर्दोषमुक्तता केल्यानंतर, आरोपीच्या निरागसतचे गृहीतक अधिक बळकत होते. शिक्षा झाल्यावर ते गृहीतक उपलब्ध नसते.

तोतासिंग वि. पंजाब राज्य शासन, ए.आय.आर. (१९८७) सु.को.१०८३ हा निवाडा येथे लागू होत नाही.

३.१ जरी सर्वसाधारणपणे खास अनुमती देऊन, केलेल्या अपिलात कनिष्ठ न्यायालयाने विचारात घेतलेल्या पुराव्याची पुर्नछाननी हे न्यायालय करत नसले तरी, उच्च न्यायालयाने विचारात घेतलेला पुरावा योग्य नसल्याने पटलावरील पुराव्याचे विश्लेषण करायला हवे.

३.२ अपिलार्थी यास भा.द.वि. ३०७/३४ आणि भा.द.वि. कलम २०१ खाली ठोठावलेली शिक्षा समर्थनीय आहे असे पटलावरील पुरावा दाखवत नाही.

फौजदारी अपेलेट अधिकार क्षेत्र फौजदारी अपिल क्रं.७४५/१९९१

ता.३१.०७.१९९० च्या फौजदारी अ. क्रं.१७२/१९८६ मधील कलकत्ता उच्च न्यायालयाच्या निकाल आणि आदेशावर.

के.व्ही. विश्वनाथन आणि के.व्ही. व्यकंटरमण -अपिलार्थीतर्फे

तपस राय, जे.आर.दास आणि डी. के. सिन्हा उत्तरवादींतर्फे

न्यायालयीन निकालपत्र न्यायमूर्ती डॉ.आनंद यांनी दिले आहे.

अपिलार्थीसह आणखी चार फरारी आरोपी मानसिंग, बाबूलाल, अर्जुन आणि गणेशचा जावई या चौघां विरुध्द सरकारचा साक्षीदार क्रं.२ मुरका मंडी याची बायको दुल्हन मंडी हिचा ता. ३१.०८.१९८२ ला, रात्री ८ वाजता खून केल्याचा दोषारोप होता. सरकारचा असा आरोप होता की, मयत महिलेला दुखापत केल्यानंतर हल्लेखोरानी आपणास कायदेशीर कारवाई पासून वाचविण्याकरीता तिचे प्रेत पुरुन टाकले. बर्दवान येथील विद्वान अतिरिक्त सत्र न्यायाधीश यांनी अपिलार्थीस भा.द.वि. कलम ३०२/३४ आणि भा.द.वि.कलम २०१ खाली दोषी धरुन, खुनाच्या अपराधाबद्दल जन्मठेप तसेच ५,०००/- रु. चा दंड अशी शिक्षा तर, पुरावा नष्ट करण्याबद्दल पाच वर्ष सक्त मजुरी आणि २,०००/- रु. दंड अशी शिक्षा ठोठावली. दोन्ही शिक्षांची अंमलबजावणी एकत्र करावी असे निर्देश देण्यात आले. ता.३१.०७.१९९० ला, या विरुध्द केलेले अपिल कलकत्ता उच्च न्यायालयाने फेटाळल्यामुळे विशेष अनुमती घेऊन त्याने हे अपिल केले आहे.

सरकार पक्षाची अपिलार्थी विरुध्द अशी 'केस' आहे की,बर्दवान जिल्हयातील धूपचिंडंगा गावच्या रहिवाश्यांचा असा समज होता की, मयत महिला ही चेटकीण असून, फरारी

आरोपी मानसिंग याच्या तान्हया मुलीच्या मृत्यूस तीच कारणीभूत आहे. ता. ३१.०८.१९८२ ला, रात्री ८ च्या सुमारास सरकारी साक्षीदार क्रं.२ मुरका मंडी आणि सिताराम मंडीसह त्याचे तीन मुलगे तसेच, सरकारी साक्षीदार क्रं.८ आणि त्याची मुलगी मयत दुल्हन मंडीसह घरात बसले असताना, मानसिंग हा फरारी आरोपी बाबूलाल आणि एका व्यक्तीबरोबर त्यांच्या घरात शिरला. त्याने सरकारी साक्षीदार क्रं.२ आणि त्याची बायको दुल्हन यांना माराहाण केली. मग त्याने तिला मानसिंगच्या घराच्या बाहेर फरफटत नेले. जेव्हा दुल्हनला तिच्या घरी मारहाण चालू होती तेव्हा, सरकारी साक्षीदार क्रं.२ आणि सरकारी साक्षीदार क्रं.८ या दोघांनी तेथून पलायन केले. अपिलार्थी हा एका फरारी आरोपीसह मानसिंगच्या घरी हजर होता. त्या सर्वांनी मिळून मानसिंगच्या घरी मयत महिलेला मारण्यात भाग घेतला. ता. ०१.०९.१९८२ ला, सकाळी साडेदहा वाजता सरकारी साक्षीदार क्रं. २ आणि ८ यांनी पोलीस ठाण्यात जाऊन नि. ७ चा वर्दीजबाब दिला. सरकारी साक्षीदार क्रं.१० चा जबाब त्रोटक स्वरुपात घेण्यात आला. त्यात कोणत्याही आरोपीचा नामोल्लेख देखील नव्हता. नंतर सरकारी साक्षीदार क्रं.१४ ने आपल्या हाती तपास घेतल्यावर, त्याने सरकारी साक्षीदार क्रं.२ याचा जबाब ०१.०९.१९८२ ला, दुपारी १२.३५ मि.नी. नोंदवला. त्या जबाबाच्या आधारे पहिली वर्दी औपचारीकरित्या नोंदवण्यात आली. ता. ०२.०९.१९८२ ला, मयत दुल्हन हिचा मृतदेह कार्यकारी दंडाधिकारी यांच्या उपस्थितीत बाहेर काढण्यात आला. त्यानंतर प्रेताचा पंचनामा होऊन ते शव-विच्छेदनासाठी पाठवण्यात आले. त्यानंतर मानसिंग आणि गणेश यांच्या घरातून, ज्या लाठयांनी दुल्हनला माराहाण करण्यात आली त्या लाठया जप्त करण्यात आल्या.

सत्र न्यायालयासमोर अपिलार्थी तर्फे असे प्रतिपादन करण्यात आले की, जर खरोखरच मयत महिलेचा मुलगा सिताराम आणि तिचा नवरा हे घटनेचे प्रत्यक्षदर्शी साक्षीदार असते तर, त्यांनी सरकारी साक्षीदार क्रं.१० ला, सांगितलेली माहिती त्रोटक नसती. तिच्यात अपिलार्थी आणि

इतरांची नावे असती. त्यांचे आणखी म्हणणे असे की, मयत महिलेचा नवरा  जर खरोखरच घटना घडतेवेळी असता तर, तिला फरफटत नेत असताना, त्याने मध्ये पडून तिला वाचविण्याची खटपट केली असती, ज्याअर्थी तसे काही घडले नाही. त्याअर्थी त्याच्या समक्ष घटना घडली का? याबद्दल शंका निर्माण होते. सत्र न्यायधिशांनी हा युक्तीवाद फेटाळला आणि आमच्या मते त्यासाठी ठोस कारण दिलेले असून ते अगदी योग्यच आहे.

उच्च न्यायालयाने अपिल फेटाळून अपिलार्थी यास दोषी धरण्याचा आणि शिक्षा ठोठावण्याचा निर्णय कायम केला. तथापि, ज्या त-हेने उच्च न्यायालयाने अपिल हाताळले त्यावर विचार करणे आवश्यक आहे. पुराव्याची विशेष चर्चा न करता, सरकार पक्षाच्या कथनाच्या आधारे असे निरीक्षण नोंदवण्यात आले की,

> विद्वान सत्र न्यायाधिशांना त्यांच्यासमोर साक्ष देणा-या साक्षीदारांचे हावभाव आणि वर्तन न्याहाळण्याची संधी होती. त्यांनी वस्तुस्थिती आणि परिस्थीती याविषयी जे मूल्यांकन केले आहे. ते चुकीचे अथवा तर्कहीन किंवा अवैध म्हणून दृष्टीआड करता येणार नाही. या कारणाने त्याच पुराव्याचे पुन्हा वेगळया दृष्टीकोनातून अथवा, त्याच दृष्टीकोनातून मूल्यांकन करुन, 'अपेलेट' न्यायालयाने आधीचे निष्कर्ष बदलू नयेत. म्हणून हे सारे विचारात घेऊन विद्वान सत्र न्यायाधिशांनी आरोपीला दोषी धरण्याचा निष्कर्षास सोडचिठ्ठी देण्याचे आम्हास कोणतेही कारण नाही.

तोतासिंग वि. पंजाब शासन ए.आय. आर. (1987) सु.को. १०८३ हा निवाडा जरी निर्दोषमुक्ततेच्या निर्णयाविरुध्द केलेल्या अपिलाशी संबधीत असला तरी, सर्वोच्च न्यायालयाने त्या निवाडयात घालून दिलेले

तत्व आरोपीस दोषी ठरवण्याच्या निर्णयास देखील लागू होते. पुराव्याची छाननी केल्यानंतर दोन दृष्टीकोन शक्य असल्यास, 'अपेलेट' न्यायालयाने आरोपीस निर्दोषमुक्त करण्याच्या आधीच्या निर्णयात हस्तक्षेप करु नये.

उच्च न्यायालयाचा दृष्टीकोन हा पूर्णत: चुकीचा आहे. शिक्षेविरुध्द केलेल्या अपिलास अपेलेट कोर्टाचे हे कर्तव्य आहे की, त्याने पुराव्याची स्वत: छाननी करावी. आणि तसे करुन जर दोन दृष्टीकोन शक्य असल्यास संशयाचा फायदा आरोपीला दयावा. हे सुचवणे बरोबर नाही की, जेव्हा खालच्या कोर्टाने पुरावा ग्राहय धरुन शिक्षा ठोठावलेली असते तेव्हा, त्याच पुराव्याची पुर्नमुल्यांकन करुन अपेलेट न्यायालय त्यास हस्तक्षेप करु शकत नाही. तोतासिंगच्या केसमधील निरीक्षण गैरसमजातून आणि यांत्रिकपणे वापरण्यात आले. आरोपीला शिक्षा ठोठावल्या विरुध्दचे अपिल आणि त्याला निर्दोष सोडलेल्या निकालावरील अपिल या दोन्हींचे काम करताना, 'अपेलेट' कोर्टाचे अधिकार जरी सारखेच विस्तृत असले तरी, त्या दोन्हीतील पुराव्याचे वजन वेगळे आणि स्वतंत्र आहे. निर्दोषमुक्तता केल्यानंतर, आरोपीच्या निरागसतचे गृहीतक अधिक बळकत होते. शिक्षा झाल्यावर ते गृहीतक उपलब्ध नसते. कनिष्ठ न्यायालय ज्या निष्कर्षाला पोहोचले त्यास 'अपेलेट' न्यायालयाने योग्य ते वजन देणे आवश्यक आहे. पण हे लक्षात ठेवणे गरजेचे आहे की, 'अपेलेट' न्यायालयाचे त्याचप्रमाणे हे ही कर्तव्य आहे की, कनिष्ठ न्यायालयाप्रमाणे पुराव्याची आंतर-बाहय तपासणी करणे आणि पटलावर उपलब्ध असलेल्या सर्व परिस्थीतीचा विचार करुन, स्वतंत्ररित्या निष्कर्षाला येणे. 'अपेलेट' न्यायालय आपल्या आवश्यक कर्तव्यापैकी, 'गुन्हेगार दोषी आहे की, निरागस आहे? या एका कर्तव्यात अपयशी ठरले आहे. पुराव्याची छाननी करण्यास ते कमी पडले आहे आणि त्या छाननीच्या आधारे स्वतंत्ररित्या निष्कर्ष नोंदवण्यात उच्च न्यायालय अपयशी ठरले आहे. त्यामुळे त्यांचा दृष्टीकोन हा स्पष्टपणे त्रुटीपूर्ण झाला आहे. जरी सर्वसाधारणपणे विशेष अनुमतीने दाखल केलेल्या अपिलात, हे

न्यायालय जो पुरावा आधीच्या दोन न्यायालयांनी विचारात घेतलेला असतो, त्याची पुर्न-छानननी करत नसले तरी,  याकामी उच्च न्यायालयाने पुराव्याचा विचार योग्यरित्या केलेला नसल्याने, पक्षकारांच्या विद्वान वकीलांच्या मदतीने आम्ही स्वत:  या कामी पुराव्याचे विश्लेषण केले आहे.

पुराव्याचे आम्ही स्वतंत्रपणे केलेले विश्लेषण असे दर्शविते की, जेव्हा मयत दुल्हन हिला मानसिंगच्या घरी आणले तेव्हा अपिलार्थी तेथे हजर होता. त्याने मानसिंगच्या घरी तिला लाथ मारली. तथापि, प्रश्न असा निर्माण होतो की, त्याने गुन्हा कोणता केला? सरकारी साक्षीदार क्रं.८ च्या विधानानुसार तो अपिलार्थीस ओळखतो. मानसिंग आणि गणेशचा जावई यांनी या साक्षीदाराच्या आईस फरफटत बाहेर नेले. त्यानंतर घटनेच्या वेळी त्याने अपिलार्थीस तेथे अंतरावर उभे असलेले पाहिले. परंतु, अपिलार्थी याने घटनेत कोणताही भाग घेतला नाही. मानसिंग अथवा अन्य फरारी सह आरोपी यांच्याशी अपिलार्थी याचे कसलेही नाते नव्हते.

सरकारी साक्षीदार क्रं.५ याच्या मते अपिलार्थी याने मयत महिलेला केवळ एकदाच लाथ मारली. या साक्षीदारांनी या व्यतिरिक्त अपिलार्थी याचा गुन्हयात कोणताही सहभाग सांगितलेला नाही. तथापि, सरकारी साक्षीदार क्रं.८ याने अशी साक्ष दिली की, मयत महिलेला लाथ मारणे या बरोबरच अपिलार्थी याने तिला एक लाठीचा तडाखाही दिला. तथापि, त्याच्या या कथनास अन्य कोणत्याही साक्षीदाराने दुजोरा दिलेला नाही. फिर्यादी पक्ष आणि अपिलार्थी यांचे संबंध चांगले नव्हते. सरकारी साक्षीदार क्रं.८ याच्या थोरल्या भावाच्या  लग्नाप्रित्यर्थ जी मेजवानी आयोजित केली होती तिच्यावर अपिलार्थीने बहिष्कार घातला होता. इतकेच नव्हे तर, त्या मेजवानीस जाण्यापासून त्याने इतर काही जणांना देखील रोखले होते. आपल्या उलट तपासात सरकारी साक्षीदार क्रं.८ याने असे कबूल केले आहे की, अपिलार्थीशी त्याचे वितुष्ट होते. या कारणाने ही शक्यता नाकारता येत नाही की,

सरकारी साक्षीदार क्रं.८ हा अतिरंजीतपणे अपिलार्थी याने लाठीचा फटका दिला असे सांगतो आहे. मानसिंगच्या घरापासून नदीच्या बाजूला मयत महिलेला फरफटत नेणे या कृत्याशी अपिलार्थी याचा संबंध होता असे सरकारी साक्षीदार क्रं.२,५ आणि ८ म्हणत नाहीत. जी जागा फरारी आरोपी बाबूलाल याने पोलीसांना दाखवली. त्याजागी नदीपाशी मयत महिलेला पुरण्यात अपिलार्थी सहभागी होता असेही नाही. या सर्व परिस्थीतीचा विचार करता, आमचे मत असे आहे की, 'मयत महिलेला ठार मारणे आणि तो पुरावा नष्ट करणे' यात अपिलार्थी याने फरारी आरोपींसह संगनमत केले असे धरणे जोखमीचे होईल.

सरकारी साक्षीदार क्रं.२, ५ आणि ८ यांच्या तोंडी पुराव्यात केवळ या बाबतीत मेळ बसतो की, अपिलार्थी याने मानसिंगच्या घरात मयत महिलेला लाथ मारली. शवविच्छेदन अहवालानुसार मयत महिलेच्या चार ठिकाणी छेद जखम (incised wound) एक कापिव जखम (lacerated wound) आणि एका बरगडयांचा अस्थिभंग या दुखापती झाल्या होत्या. बरगाडयाच्या अस्थिभंगाशी अपिलार्थी आणि सह आरोपी यांचा संबंध होता. त्यामुळे अपिलार्थी केवळ भा.द.वि.कलम ३२५ कलम ३४ सह अपराध केल्याबद्दल दोषी मानता येईल. पटलावर आलेल्या पुराव्यावरुन त्यास भा.द.वि.कलम ३०२/३४ आणि भा.द.वि. कलम २०१ खाली ठोठावलेली शिक्षा समर्थनिय नाही. म्हणून ती शिक्षा रद्द करुन आम्ही त्यास भा.द.वि.कलम ३२५/३४ च्या अपराधाबद्दल दोषी धरले आहे. त्याने या आधीच भोगलेली सक्त मजुरीची शिक्षा त्याला ठोठावली आहे. वरीलप्रमाणे सदरचे अपिल वरील मर्यादेपर्यंत यशस्वी ठरले आहे. जर अपिलार्थी याची अन्य कोणत्याही खटल्याचे कामी गरज नसेल तर, त्यास त्वरीत मुक्त करावे.

याचिका निकाली काढण्यात आली.

## अस्वीकरण

या न्यायनिर्णयाच्या मराठी भाषेतील या अनुवादाचा वापर हा पक्षकारास त्याच्या/ तिच्या मातृभाषेमध्ये त्याचा अर्थ समजून घेण्यापुरताच मर्यादित राहील आणि त्याचा इतर कोणत्याही कारणाकरता वापर करता येणार नाही तसेच इंग्रजी भाषेतील न्यायनिर्णय हाच सर्व व्यावहारिक आणि कार्यालयीन वापराकरिता विश्वसनीय असेल आणि तोच त्यातील आदेशाच्या निष्पादन आणि अंमलबजावणी करता वैध मानला जाईल.